३६ भारतीय स्वातंत्र्यानंतरची दलितांची राजकीय वाटचाल आणि स्थिती
- डॉ.जनार्दन जाधव, गगनबावडा, जि.कोल्हापूर ---------------------- १६६

३७ बीसवीं सदी के अंतिम दशक के हिंदी के सामाजिक नाटकों में महानगरीय जीवन बोध : अकेलेपन के संदर्भ में - डॉ.राहुल मराठे, लांजा. जि.रत्नागिरी ---------------------- १७०

३८ चंद्रपूर जिल्ह्यातील आंबेडकरोत्तर चळवळीत समता सैनिक दलाचे योगदान
- डॉ. प्रफुल राजुरवाडे, चिमूर, जि.चंद्रपूर. ---------------------- १७४

३९ चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी महिलांच्या विकासात स्वंयसहाय्यता बचत गटाचे योगदान
- प्रा.पितांबर पिसे, डॉ. संजय कुंभारे, जि.चंद्रपूर ---------------------- १७७

४० स्वातंत्र्योत्तर काळातील सोलापूर जिल्ह्याचे पर्यटन विषयक धोरण : एक चिकित्सक आढावा
- डॉ.रविराज कांबळे, पंढरपूर, जि.सोलापूर ---------------------- १८१

४१ महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरूप
- बाळू गायकवाड, मोहोळ, जि.सोलापूर ---------------------- १८६

४२ स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या आत्मचरित्रातून दिसणारे महिला सक्षमीकरण
- डॉ.सारिका बुरगे, केज, जि.बीड ---------------------- १८८

४३ स्वातंत्र्यानंतरचे भारतीय जीवन: कवितेतून व्यक्त झालेले चिंतन
- डॉ.महेश बावधनकर, लांजा, जि.रत्नागिरी ---------------------- १९२

४४ भारतीय स्वांतंत्र्योत्तर काळातील ग्रंथालये
- राजू बोंबले, डॉ.शोभा सुळसुळे, जि.परभणी ---------------------- १९८

४५ भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्रांतिकारकांनी दिलेले योगदान व स्वातंत्र्य लढे - गजानन होडे, डॉ.रामभाऊ मुटकुळे, नाशिक ---------------------- २०२

४६ स्वातंत्रोत्तर भारताचे शैक्षणिक धोरण : एक आढावा
- डॉ.रूपेश मेश्राम, ब्रह्मपुरी, चंद्रपूर ---------------------- २०८

४७ कोकणातील पर्यटन विकास प्रक्रीयेतील समस्यांचा अभ्यास
- डॉ.देविदास हारगिले, मालवण, सिंधुदुर्ग ---------------------- २१४

४८ महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरूप
- प्रा.हेमश्री चिटणीस, देवगड, जि.सिंधुदुर्ग ---------------------- २१८

४९ भारतीय स्वातंत्र्यानंतरचे बदलते शैक्षणिक धोरण
- प्रियंका कुंभार, कोंडवे, सातारा, ---------------------- २२३

५० स्वातंत्र्योत्तर भारतामधील कुस्ती क्षेत्रात कोल्हापूरने मिळविलेला नावलौकिक एक अभ्यास
- डॉ.संभाजी मोरे, तिसंगी. ---------------------- २२८

५१ भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या आर्थिक धोरणांचा संक्षिप्त मागोवा
- डॉ.श्रीकांत चांदोरकर, गोरेगाव, रायगड ---------------------- २३२

५२ मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संस्थेच्या प्रगतीतील डॉ.वसंतराव पवार यांचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास - अमित निकम, डॉ.रमेश जाधव, जि.नाशिक ---------------------- २३६

५३ माहिति तंत्रज्ञानाचे बदलते स्वरुप - डॉ.सीता केंद्रे, केज, जि.बीड ---------------------- २४१

५४ स्वातंत्र्योत्तर भारताच्या सामाजिक चळवळी मध्ये बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे योगदान
- श्री.जयंतकुमार रामटेके, डॉ.रूपेश मेश्राम, जि.चंद्रपूर ---------------------- २४४

# भारतीय स्वांतत्र्योत्तर काळातील ग्रंथालये


**बोंबले राजू बालासाहेब**

**हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर (ग्रंथपाल)**

**मो.नं.-:७२१९७८१८६५. ईमेल-: rajbomble18@gmail.com**

**पत्ता-: मु.पोस्ट डासाळा, ता.सेलू जिल्हा परभणी, पिन कोड : ४३१५०३.**

**डॉ. सुळसुळे शोभा राजाभाऊ**

**महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर (ग्रंथपाल)**

**मो.नं.-:९७३०९४७२४९, Email : shobha.susule@gmail.com**



**सार :**

भारताला वाचन आणि लेखनसंस्कृतीची प्रदीर्घ परंपरा आहे. या परंपरेला देशातील ग्रंथालयांनी पाठिंबा दिला. समाजप्रबोधनाच्या, माहितीच्या देवाणघेवाणीच्या दृष्टिकोनातून प्राचीन कालखंडापासून ते भारतीय स्वतंत्र काळापर्यंत आज ग्रंथाला एक विशिष्ट महत्व प्राप्त झालेले आहे. या ग्रंथांना एकरूप करण्याचे काम म्हणजे ग्रंथालय ही करत असते.


**प्रास्ताविक :-**

स्वातंत्र्योत्तर कालखंड : (१९४७ पासून पुढे). स्वातंत्र्योत्तरकालात जवळजवळ प्रत्येक घटक राज्यात ग्रंथालय संघ स्थापन झाले आहेत. तसेच सार्वजनिक ग्रंथालयेही स्थापन झाली आहेत परंतु त्यातील बहुतेक ग्रंथालयांचे स्वरूप वर्गणी ग्रंथालयाचे आहे. अशा ग्रंथालयांची पाहणी करून शासनाला मार्गदर्शन करण्यासाठी भारत सरकारने १९५८ मध्ये के.पी. सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीचे कार्य म्हणजे जुन्या-नव्या ग्रंथालयांची सद्यःस्थिती, त्यांची भावी कार्यपद्धती, आर्थिक साह्याचे स्वरूप, ग्रंथालयांच्या कारभारातील सहकार्य इ. बाबींसंबंधी मूलभूत स्वरूपाचे मार्गदर्शन करणे, हे होते. या समितीचा अहवालही १९५९ मध्ये प्रसिद्ध झाला परंतु त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही.

भारताच्या पंचवार्षिक योजनांमधून सार्वजनिक ग्रंथालयांच्या स्थापनेसाठी आणि वाढीसाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करण्यात आली. त्यांतून काही राज्यांतून मध्यवर्ती व जिल्हा ग्रंथालयांची स्थापना झाली खरी परंतु सर्व भारतात ग्रंथालयसेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने अद्यपि फार मोठा पल्ला गाठावयाचा आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाने देशातील विद्यापीठांच्या ग्रंथालयांना क्रमिकग्रंथ, संदर्भग्रंथ व शास्त्रविषयक ग्रंथ खरेदी करण्यासाठी इतकेच नव्हे, तर इमारतीसाठीही अनुदान दिले. या मंडळाने नेमलेल्या डॉ. रंगनाथन् ग्रंथालय समितीने विद्यापीठ व महाविद्यालये यांतील ग्रंथालयांतून काम करणाऱ्या ग्रंथपालांच्या सेवानियमांसंबंधी तसेच प्रशिक्षणासंबंधी मूलभूत स्वरूपाच्या शिफारसी केल्या.

**भारतीय स्वांतत्र्योत्तर काळातील ग्रंथालयातील सेवा :**

माहिती ही सर्व सामाजिक घटकाची आवश्यक बाब झाली आहे. माहिती निर्मितीच्या क्षेत्रात समाजातील वैयक्तिक घटक तसेच विविध संस्था यांचा सहभाग असतो. उदा. शिक्षण संस्था, विद्यापीठे, संशोधन व विकास संस्था यांच्यामार्फत होणारे संशोधन प्रगत अभ्यासामुळे नवीन माहिती व ज्ञानाचा विकास होतो. तसेच शासकीय अशा विविध प्रकारची माहिती निर्माण होत असते. नव्याने निर्माण झालेली माहिती ही विविध माहिती माध्यमांद्वारे उपभोक्त्यांपर्यंत नेण्याचे कार्य केले जाते. ही माहिती छापील स्वरूपात किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे वितरीत प्रकाशित केली जाते. छापील स्वरूपातील माहिती ही प्राथमिक साधने (उदा. नियतकालिके, स्टॅंडर्डस्, पेटंटस्, प्रबंध इत्यादी), दुतीय साधने (सारस्वरूप नियतकालिके, निर्देशन नियतकालिके इत्यादी), तसेच तृतियक साधने (उदा. डिरेक्टरीज, सूचची सूची, गाईड बुक्स इत्यादी) स्वरूपात असतात. इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध होणाऱ्या माहिती साधनांना ई-रिसोर्सेस असे संबोधतात. उदा. ई-बुक्स, ई-जर्नल्स, ई-सारस्वरूप नियतकालिके इत्यादी. ही माहिती साधने विविध माहिती सेवांच्या आधारे वाचकांपर्यंत पोहचवितात.

**१) फिरते ग्रंथालय सेवा :** मोबाइल लायब्ररी हे एक फिरते वाचनालय म्हणून वाचकांच्या वापरासाठी ग्रंथसंग्रहाची रचना केलेले वाहन असते. संभाव्य वाचकांपर्यंत ग्रंथ पाठवून ग्रंथालयांच्या सेवांचा विस्तार करतात. जेथे सेवासुविधा पोहोचत नाहीत अशा दुर्गम ठिकाणी किंवा दूरवरच्या

ISSN No. 2394-5990

…देशातील लोकांना ग्रंथालय सेवा प्रदान करणे व त्यांच्यामध्ये वाचन सवयी रुजवणे हा या मागील प्रमुख दृष्टिकोन आहे. अशी संकल्पना असलेल्या या उपक्रमांतर्गत संस्थेचे वाचनदूत ठराविक पुस्तके घेऊन रेल्वेच्या डब्यांमध्ये देखील फिरतात. विशेष म्हणजे ही सुविधा पूर्णपणे मोफत देण्यात येते. दिल्ली पब्लिक लायब्ररी, नवी दिल्ली :१९५० मध्ये युनेस्कोच्या सहकार्याने हिची स्थापना झाली असून प्रायोगिक – सार्वजनिक ग्रंथालय, सर्वांना मोफत ग्रंथसेवा, संदर्भ, नियतकालिके हे स्वतंत्र विभाग, मुले, स्त्रिया आणि अंध यांच्यासाठी स्वतंत्र सोय, मुख्य ग्रंथालय व त्याची ४ शाखा ग्रंथालये, १८ देवघेव केंद्रे आणि ४ फिरती वाचनालये असून २६,००,००० ग्रंथसंग्रह येथे आहे.

२) पुस्तक जत्रा आणि प्रदर्शन : एखादया घटनेच्या स्मृतीप्रित्यर्थ तसेच विविध प्रसंगांचे जसे राष्ट्र पुरुषांच्या जयंतीचे व पुण्यतिथीचे औचित्य साधून संबंधित विषयावरील ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित करणे. दुर्मिळ ग्रंथ, स्थानिक इतिहासावरील ग्रंथ साहित्य, स्थानिक सणांविषयी माहिती देणारे ग्रंथ साहित्य, कलाकृती, छायाचित्रे, चित्रे यांची प्रदर्शने आयोजित करून समाजाचे लक्ष ग्रंथालयाकडे वेधून घेणे.

पुस्तक जत्रा आणि प्रदर्शन :

३) सोशल नेटवर्किंग सेवा : सोशल नेटवर्किंग साईटस् वेब आधारित असतात. यांच्या आधारे ग्रंथालये वाचकांना इंटरनेटवर विविध प्रकारच्या सेवा प्रदान करतात. ग्रंथालयातील वाचन साधने, सेवा सुविधा, उपक्रम आणि कार्यक्रम इत्यादींविषयी वाचकांना अवगत करतात. यासाठी ई-मेल, इन्स्टंट मेसेजिंग, फेसबुक, ट्विटर, माय स्पेस, लिंक्ड–इन या सोशल नेटवर्किंग टूल्सचा वापर केला जातो. माहिती साक्षरता (Information Literacy) 'माहिती साक्षरता' ही संकल्पना सर्वप्रथम १९७४ मध्ये पॉल जी झुर्कोस्की यांनी नॅशनल कमिशन ऑन लायब्ररीज अँड इन्फरमेशन सायन्सच्या वतीने लिहिलेल्या अहवालात समाविष्ट केलेली होती. तसेच १९९९ मध्ये स्कोन्यूल (SCONUL = Society of College, National and University Libraries) युके या संस्थेने 'द सेव्हन पिलर्स ऑफ इन्फरमेशन लिटरसी' या शीर्षकाचे मॉडेल प्रकाशित केले. यानंतर अनेक देशांनी माहिती साक्षरतेची प्रारूपे (Models) विकसित केली आहेत. ग्रंथालये आणि माहिती सेवा पुरवणाऱ्या संस्थांच्या साहाय्याने माहिती साक्षरता कार्यक्रमाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर विकास करणे हा इफ्लाच्या माहिती साक्षरता विभागाचा प्रमुख उद्देश होय.

**सोशल नेटवर्किंग सेवा :**

**भारतीय स्वांतत्र्योत्तर काळातील ग्रंथालये :-**

स्वातंत्र्योत्तर काळात 'आयएनबी' सारखी संस्था सातत्याने काम करते आहे. तिचे नेमके महत्त्व काय आहे? भारतीय राष्ट्रीय सूचीचे (इंडियन नॅशनल बिब्लिओग्राफी – आयएनबी) काम १९५८पासून सुरू झाले असले, तरी त्या आधी भारतीय संदर्भ ग्रंथालयाची स्थापना देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ऑगस्ट १९५५मध्ये झाली. दोघांच्या समन्वयातूनच भारतातील इंग्रजीसह महत्त्वाच्या १४ भाषांमधील ग्रंथनिर्मितीची नोंद एका सूचीच्या स्वरूपात सुरू झाली. त्यामध्ये मराठी, बंगाली, गुजराथी, हिंदी, कन्नड, मैथिली, मल्याळम, ओरिया, पंजाबी, संस्कृत, तमीळ, तेलुगू आणि उर्दू यांचा समावेश करण्यात आला. देशातील या १४ भाषांमध्ये होणाऱ्या पुस्तकांच्या प्रकाशित आवृत्त्यांची नोंद करण्यासाठी त्याची एक प्रत कोलकात्याच्या भारतीय संदर्भ ग्रंथालयास पाठवणे बंधनकारक आहे. तसेच या पुस्तकाची प्रत्येकी एक प्रत दिल्ली, चेन्नई आणि मुंबईतील राष्ट्रीय ग्रंथालयांकडे पाठवणे आवश्यक आहे. हे सारे १९५४मध्ये घटनेने तयार केलेल्या पुस्तके व समाचारपत्र प्रदान कायद्यानुसार होणे गरजेचे आहे. हे लक्षात घेता प्रत्येक प्रकाशकाने त्याचे प्रत्येक प्रकाशित पुस्तक प्रकाशित झाल्यावर ३० दिवसांमध्ये 'भारतीय संदर्भ ग्रंथालयाला बेलवेदरे, कोलकाता – ७०००२७' या पत्त्यावर पाठवणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास दंडात्मक कारवाईही होऊ शकते. यातून देशातील सर्व भाषांमधील पुस्तकांची नेमकी संख्या, विषयवार माहिती व लेखन सूची अधिकाधिक व्यापक व समृद्ध करणे शक्य आहे. त्या दृष्टीने आयएनबी ही देशातील अधिकृत असणारी पहिली राष्ट्रीय पातळीवरील सरकारी ग्रंथसूची मातृसंस्था आहे. त्यामुळे आजच्या माहितीच्या स्फोटाच्या काळात तिचे हे काम अनन्यसाधारण आहे.

देशातील इतक्या व्यापक पातळीवरचे ग्रंथसूचीचे हे महाकाय काम एकत्र करताना त्यात सुसूत्रता यावी, यासाठी तेव्हा कोणता मार्ग निवडला? – या सर्व भाषांमधील पुस्तके सूचीसाठी नोंदवताना त्याचे वर्गीकरण, शीर्षक, लेखकाचे नाव, प्रकाशन स्थळ, वर्ष, पुस्तकाचा आकार, किंमत, भाषा इत्यादी अनेक तपशील विचारात घेतले गेले. या सर्व भाषा भिन्न असल्या, तरी त्यांची एकत्रित नोंद आधी रोमन लिपीत करण्यात आली, ज्यात त्या त्या

भाषेतील उच्चारांना धरून शास्त्रशुद्ध असणाऱ्या 'डायक्रिटिकल मार्क्स'चा वापर करण्यात आला. कारण मराठीतील दानव हा शब्द घेतला तर द'चा काना व द' आणि ड'चे स्पेलिंग डी' असेच होते. तसेच न' आणि ण' यांना एन' असेच संबोधले जाते. त्यामुळे त्यातील नेमका भेद त्यात 'डायक्रिटिकल मार्क्स'चा वापर केल्यामुळे वाचणाऱ्यांना कळतो. संगणकातील भाषांसाठी सुरुवातीला पुण्यातील सी–डॅक संस्थेने या भाषांसाठी तयार केलेले जिस्ट हे भाषा सॉफ्टवेअर, आहे.

**भारतीय स्वांतत्र्योत्तर काळातील ग्रंथालयांची कामे :–**

**१–महाविद्यालय ग्रंथालय :** महाविद्यालयात विधार्थी, प्राध्यापक यांच्यासाठी जे ग्रंथालय उपलब्ध असते त्यास महाविद्यालय ग्रंथालय असे म्हणतात.

महाविद्यालय ग्रंथालयांची कामे :

१. विद्यार्थी, प्राधापक यांना क्रमिक पुस्तके व इतर वाचन साहित्य पुरवणे.
२. ग्रंथालयात एखादे पुस्तक नसल्यास ते इतर ग्रंथालयातून आंतर देवघेवी द्वारे आणून देणे.
३. ग्रंथालयात आलेल्या नवीन पुस्तकांची यादी देणे.
४. सदर्भ ग्रंथ पुरविणे.
५. वाचकांना मार्गदर्शन करणे.
६. पुस्तकांचे तालिकीकरण व वर्गीकरण करणे.
७. वाचन विभाग उपलब्ध करून देणे.
८. विशेष दिनादिवशी ग्रंथप्रदर्शन आयोजित करणे.
९. संशोधन कार्यात मदत करणे.
१०. विद्यार्थ्यांमध्ये वाचन कौशल्ये विकसित करणे.
११. कारकीर्द मार्गदर्शन करणे, या संदर्भात स्पर्धा परीक्षांविषयी माहिती देणे. सर्व ग्रंथ आणि नियतकालिके यांची माहिती पुरविणे.
१२. वृत्तपत्र कात्रणे काढून अद्यावत माहिती शिक्षक व विद्यार्थी यांना पुरविणे.
१३. ग्रंथालयाच्या उपयोगाकरिता मार्गदर्शन करणे.
१४. संदर्भ ग्रंथाची माहिती देऊन त्यांतील मजकुराची व त्या ग्रंथाचा उपयोग कसा करावयाचा याविषयी मार्गदर्शन करणे.
१५. विविध विषयांच्या मागणीनुसार सूची तयार करून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे.
१६. ग्रंथ मंडळाची स्थापना करणे, व ग्रंथांवर चर्चासत्रे आयोजित करणे.

**२. विद्यापीठ ग्रंथालय :**

विद्यापीठात प्रवेश घेतलेले विद्यार्थी, प्राधापक, संशोधक यांच्यासाठी विद्यापीठात असणारे ग्रंथालय म्हणजे विद्यापीठ ग्रंथालय होय. विद्यापीठ ग्रंथालय हे विद्यापीठातील विविध ज्ञानशाखांतील विद्यार्थी, शिक्षक व संशोधक यांच्याकरिता निर्माण केलेली ग्रंथालय प्रणाली होय. विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रमुख वाचक पदव्युत्तर विद्यार्थी, शिक्षक वर्ग, संशोधन करणारे विद्यार्थी, संलग्न महविद्यालयातील शिक्षकवर्ग, बहिस्थ विद्यार्थी स्थानिक नागरिक, शासकीय अधिकारी इत्यादी असतात. या ग्रंथालयांतून अभ्यासकांना विविध प्रकारच्या ग्रंथालयीन माहिती सेवा व डिजिटल वाचन साहित्याच्या साह्याने पुरविल्या जातात.

विद्यापीठ ग्रंथालयाची कामे :

१. ग्रंथ संग्रह विकासाचे धोरण ठरविणे.
२. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाशी निगडित विविध विषयांचे ग्रंथ, नियतकालिके व इतर वाचन साहित्य उपलब्ध करून देणे.
३. आंतर ग्रंथालयीन देवाण घेवाण कार्यक्रमातून वाचन साहित्य उपलब्ध करून देणे.
४. संदर्भ ग्रंथाची ओळख करून देणे.
५. ग्रंथालयाचा उपयोग कसा करावा या संदर्भात मार्गदर्शन करणे.
६. विद्यार्थ्यांना कारकीर्दविषयी मार्गदर्शन करणे.
७. वर्तमानपत्रांची कात्रणे काढून वाचकांना पुरवणे.
८. मागणीनुसार विषयवार सूची तयार करून देणे.
९. पदव्युत्तर विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्प पूर्ण करायचा असतो, या संदर्भाकरिता सूची कशी तयार करावी, वाङ्मय शोध कसा करावा, संदर्भ कसे द्यावेत व संशोधन प्रकल्पाचा आराखडा या संदर्भात मार्गदर्शन करणे.
१०. ग्रंथ प्रदर्शन आयोजित करणे.
११. ग्रंथालयाचा वार्षिक अहवाल तयार करणे, तसेच ग्रंथालयाची नियमावली व अंदाजपत्रक तयार करणे.
१२. इंटरनेटच्या माध्यमातून विविध सेवा पुरविणे.
१३. शिक्षक व संशोधक त्यांच्या संशोधनासाठी आवश्यक त्या माहिती सेवा पुरविणे.

**३ सार्वजनिक ग्रंथालय :**

सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे शिक्षण, संस्कृती, माहिती, आणि शांतता प्रथापित करणारी तसेच नागरिकांमध्ये व विविध देशांमध्ये सौमंजस्य निर्माण करणारी अत्यावश्यक

ISSN No. 2394-5990

...स्थ होय.

...र्वजनिक ग्रंथालय म्हणजे ज्या ग्रंथालयात समाजातील ...र्व ...नी धर्माच्या वाचकांना वंश, वर्ण, वर्ग, असा ...गत ही भेदाभेद न करता त्यांना हवे असलेले वाचन साहित्य कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय निरपेक्षपणे मोफत किंवा ...ल्प वर्गणी घेऊन उपलब्ध करून दिले जाते. अशा ...लयाला सार्वजनिक ग्रंथालय असे म्हणतात.

...व ग्रंथालयाची उभारणी शासनाच्या कायद्यानुसार ...ली ...ते. त्याचे संचालन सार्वजनिक निधीतून केले जाते. ...ग्रंथालये समाजातील सर्व नागरिकांना सेवा पुरवतात.

सार्वजनिक ग्रंथालयाची कामे :

- ग्रंथालय ज्या ठिकाणी आहे त्या परिसरातील वाचकांची, ...ड. गरज आणि त्यांचा कल विचारात घेऊन ग्रंथ, नियतकालिके व दृक्श्राव्य साधनांचे संकलन करणे.
- विद्यार्थ्यांना व शिक्षकाना क्रमिक पुस्तके व संदर्भ पुरविणे.
- ...धक व अभ्यासक यांना अद्यावत वाचन साहित्य उपलब्ध करून देणे.
- ...ना प्रसारासाठी विविध प्रकारचे उपक्रम आयोजित करणे.
- अनौपचारिक शिक्षणासाठी व निरंतर शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे.
- स्थानिक परिसरातील वस्तू, हस्तकला इत्यादी जतन करणे.
- ...न प्रबोधनासाठी विविध प्रकारच्या व्याख्यानमाला, परिसंवाद, नाटके, ग्रंथप्रदर्शने आयोजित करणे.
- विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविणे. त्यासाठी विज्ञानविषयक व्याखाने परिसंवाद इत्यादींसारखे उपक्रम आयोजित करणे.
- ...कांसाठी व महिलांसाठी स्वतंत्र दालन उपलब्ध करून देणे व त्यांच्यासाठी लागणारे वाचन साहित्य संग्रहित करणे व त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करणे.
- माहिती केंद्र म्हणून काम करणे.
- ग्रंथालय व ग्रंथालय यांचा प्रसार व प्रचार करणे.
- सार्वजनिक ग्रंथालय हे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य करते.
- १३. सर्व नागरिकांना स्वयंशिक्षणासाठी मदत करणे.

**निष्कर्ष :**

भारतीय स्वतंत्र काळातील ग्रंथालय कशा प्रकारे आज आपल्याला दिसून येतात, स्वतंत्र कालखंडापासून ते आजपर्यंत मोठ्या प्रमाणात ग्रंथालय हे विकसित झालेले दिसून येते. त्याचप्रमाणे सोशल नेटवर्किंग चे जाळे आज मोठ्या प्रमाणात दिसून येते ग्रंथालयाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढताना दिसून येत आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठ ग्रंथालय महाविद्यालय ग्रंथालय व सार्वजनिक ग्रंथालय यांची विविध कामे आज मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. त्याला एवढेच म्हणता येईल की, ग्रंथालये महाविद्यालयाचा, विद्यापीठाचा व सार्वजनिक ग्रंथालयाचा आत्मा आहे.

**संदर्भसूची :**


१. ग्रंथालय संगणकीकरण, पाटील प्रदीप, सोनवणे कल्पना प्रशांत पब्लिकेशन २०१९.
२. ग्रंथालय सेवा, सोनवणे कल्पना, पाटील प्रदीप, प्रशांत पब्लिकेशन २०१८.
३. ग्रंथालय तंत्र व मंत्र, पुरुषोत्तम रोहणकर, महाजन पब्लिकेशन हाऊस २०२०.
४. Davis, Donald G., Jr. The Status of Library History in India: - Report of an Informal Survey and a Selective Bibliographic Essay. Journal of Library and Information Science 14.2 (1989): 98.
५. Rajgopalan, T. S. Trends and Perspectives in Indian Librarianship. Presidential Address, Indian Library Association Conference, 1987.
६. Ranganathan, S. R. Radio Talk of April 1956. Mohamed Taher and Donald G. Davis, Jr. Librarianship and Library Science in India. 3.
७. ...garwal, J. N. Libraries in Ancient India. Indian Librarian 8.4 (1954): 141.
८. Chakravorty, S. N. Libraries in Ancient Times with Special Reference to India. Indian Librarian 9.2 (1954): 53.